# शिवसेनेच्या शिवसंकल्प अभियानाला शनिवारपासून प्रारंभ

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शिरूर, मावळमध्ये प्रचार मेळावे

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** लोकसभेच्या 'मिशन-४८'साठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसंकल्प अभियानाची घोषणा केली असून जिल्ह्यातील शिरूर आणि मावळ लोकसभा मतदारसंघातून या अभियानाला शनिवारपासून प्रारंभ होणार आहे. शिवसंकल्प अभियानाच्या निमित्ताने मुख्यमंत्री शिंदे यांचे प्रचार मेळावे होणार असून यानिमित्ताने लोकसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकले जाणार आहे. राज्यातील लोकसभेच्या ४८ जागा पूर्ण ताकदीनिशी लढवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. शिवसंकल्प अभियानाच्या पार्श्वभूमीवर शहर पदाधिकाऱ्यांची नियोजनाची बैठक गुरुवारी झाली. शहर प्रमुख नाना भानगिरे, पुणे लोकसभा निरीक्षक किशोर भोसले, जिल्हा प्रमुख रमेश कोंडे, युवासेना सचिव किरण साळी, युवासेनेचे जिल्हा प्रमुख निलेश घारे, सहसंपर्क प्रमुख अविनाश खेडेकर, महिला आघाडी शहर प्रमुख पूजा रावेतकर यांच्यासह अन्य प्रमुख पदाधिकारी, युवासेना, महिला आघाडी आणि अंगिकृत संघटनांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. शिवदूत, बुथप्रमुख इथपासून ते शहरप्रमुखांपर्यंत नव्या जोमाने कामाला



लागून, पक्षाला नव्याने उभारी देण्यासाठी आणि नव्या उमेदीने पक्ष बांधणी करून, पक्ष वाढीस हातभार लावण्याची सूचना यावेळी करण्यात आली. शिवसंकल्प अभियानाचे प्रचार मेळावे दोन टप्प्यात पार पडणार असून त्यातील पहिला टप्पा ६ जानेवारी रोजी शिरूर येथून सुरू होणार असून ११ जानेवारी रोजी छत्रपती संभाजीनगर येथील सभेने पहिल्या टप्प्यातील प्रचार दौरा पूर्ण होणार आहे. दुसऱ्या टप्प्यात २५ जानेवारीपासून पुन्हा प्रचार मेळाव्यांना सुरूवात होणार असून या दिवशी शिर्डी येथे दुसरा प्रचार मेळावा पार पडेल, तर या प्रचार मेळाव्यांचा समारोप ३० जानेवारी रोजी हातकणंगले येथे होईल. प्रचार मेळाव्यांच्या समारोपासह कोल्हापूर येथे दोन दिवसीय विशेष महाशिबिराचे आयोजन करण्यात येणार असून त्यानंतर या शिवसंकल्प अभियानाची सांगता होणार आहे.

लोकसभेच्या 'मिशन-४८'साठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसंकल्प अभियानाची घोषणा केली असून जिल्ह्यातील शिरूर आणि मावळ लोकसभा मतदारसंघातून या अभियानाला शनिवारपासून प्रारंभ होणार आहे. शिवसंकल्प अभियानाच्या निमित्ताने मुख्यमंत्री शिंदे यांचे प्रचार मेळावे होणार असून यानिमित्ताने लोकसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकले जाणार आहे. राज्यातील लोकसभेच्या ४८ जागा पूर्ण ताकदीनिशी लढवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. शहर प्रमुख नाना भानगिरे, पुणे लोकसभा निरीक्षक किशोर भोसले, जिल्हा प्रमुख रमेश कोंडे, युवासेना सचिव किरण साळी, युवासेनेचे जिल्हा प्रमुख निलेश घारे, सहसंपर्क प्रमुख अविनाश खेडेकर, महिला आघाडी शहर प्रमुख पूजा रावेतकर यांच्यासह अन्य प्रमुख पदाधिकारी, युवासेना, महिला आघाडी आणि अंगिकृत संघटनांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# संशोधक विद्यार्थ्यांना सरसकट शिष्यवृत्ती द्या!

## नितीन गडकरी यांचे चंद्रकांत पाटील यांना पत्र

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महाराष्ट्रात संशोधक विद्यार्थ्यांवर इतर राज्यांच्या तुलनेत अत्यंत कमी निधी खर्च केला जातो. बार्टी, सारथी आणि महाज्योतीच्या माध्यमातून पीएच.डी. करणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांना राज्य सरकारने अटी शिथिल करून सरसकट शिष्यवृत्ती देण्याची आवश्यकता आहे, असे पत्र केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांना दिले आहे. राज्यातील संशोधक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी येत्या १० जानेवारीला चाळणी परीक्षा घेतली जाणार आहे. मात्र, परीक्षा न घेता सरसकट शिष्यवृत्ती देण्याच्या मागणीसाठी विद्यार्थ्यांकडून आंदोलन केले जात आहे. या मागणीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांकडून गडकरी यांना निवेदन देण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर गडकरी यांनी पाटील यांना पत्र दिले आहे. गडकरी यांच्या पत्रानुसार, पीएच. डी. करणाऱ्या प्रत्येक संशोधकाला समाजातील, देशातील प्रमुख अडचणी, दुखणी, कमतरता यावर शास्त्रशुध्द संशोधन, विदा संकलन करून संशोधनाची





मांडणी करावी लागते. दोन शोधलेख, संधोधन लेखन यासाठी पीएच. डी. करणाऱ्यांना मेहनत घ्यावी लागते. मात्र, बार्टी, सारथी, महाज्योतीसारख्या माध्यमातून पीएच. डी. करणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांना राज्य सरकारकडून मदत मिळत नसल्याचे विद्यार्थ्यांनी नमूद केले आहे. या विद्यार्थ्यांना राज्य सरकारद्वारे सरसकट शिष्यवृत्ती देणे गरजेचे आहे. मात्र पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळत नसल्याचे दिसून येत आहे.महाराष्ट्रात

संशोधक विद्यार्थ्यांवर इतर राज्यांच्या तुलनेत अत्यंत कमी निधी खर्च केला जातो. बार्टी, सारथी आणि महाज्योतीच्या माध्यमातून पीएच.डी. करणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांना राज्य सरकारने अटी शिथिल करून सरसकट शिष्यवृत्ती देण्याची आवश्यकता आहे, असे पत्र केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांना दिले आहे. राज्यातील संशोधक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी येत्या १० जानेवारीला चाळणी परीक्षा घेतली जाणार आहे. मात्र, परीक्षा न घेता सरसकट शिष्यवृत्ती देण्याच्या मागणीसाठी विद्यार्थ्यांकडून आंदोलन केले जात आहे. या मागणीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांकडून गडकरी यांना निवेदन देण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर गडकरी यांनी पाटील यांना पत्र दिले आहे. गडकरी यांच्या पत्रानुसार, पीएच. डी. करणाऱ्या प्रत्येक संशोधकाला समाजातील, देशातील प्रमुख अडचणी, दुखणी, कमतरता यावर शास्त्रशुध्द संशोधन, विदा संकलन करून संशोधनाची मांडणी करावी लागते.